**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )**

**बुधवार दिनांक १ जुलै २०२६**

**ठळक बातम्या....**

1. **विकसित भारत जी राम जी कायदा आजपासून देशभरात लागू**
2. **विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची बिनविरोध निवड**
3. **राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत किमान १० वर्षे सेवा पूर्ण केलेल्या सुमारे १५ हजार कंत्राटी कामगारांच्या समायोजनाचा शासन निर्णय निर्गमित**
4. **नागपूरसह विदर्भाच्या बहुतांश जिल्हयात उद्या मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट**

---------------------------------------

**जीरामजी**

रोजगाराची हमी देणारा विकसित भारत जीरामजी अर्थात विकसित भारत - रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा २०२५ आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू होत आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात १२५ दिवसांच्या वेतनासह रोजगाराची हमी देणारा हा कायदा ग्रामीण भारताला सक्षम करेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्रालयानं व्यक्त केला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात ९५ हजार ६९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विहित मुदतीत काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणार आहे. पात्र कामगारांना दररोज रोजगार मिळवा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या समन्वयातून सर्व तयारी पूर्ण केली आहे, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

---------------------------------------

**सचिन अहिर**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर यांची आज एकमताने निवड झाली. ही नियुक्ती निवडणूक होऊन नाही, तर एकमताने होणं ही या सभागृहाची परंपरा असून ती यंदाही तशीच व्हावी, असं सांगून महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी आपला अर्ज मागे घ्यावा, अशी विनंती संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली, त्यानुसार अर्ज मागे घेतल्याची घोषणा अभिजित

वंजारी यांनी केली. त्यानंतर आवाजी मतदानाने सचिन अहिर यांची एकमताने उपसभापती म्हणून निवड झाली. तसंच विधानपरिषद सभापती राम शिंदे यांनी आज नवनिर्वाचित सदस्य सईद खान यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ दिली.ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा आढावा आमच्या प्रतिनिधींकडून -

*( व्हॉइस कास्ट)*

***PCPNDT कायद्यांतर्गत, IVF सेंटर, सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. ठाणे जिल्ह्यात बदलापूरमध्ये झालेल्या स्त्री बीज तस्करी प्रकरणी ते बोलत होते. यावेळी त्यांनी IVF सेंटर आणि सिझेरियन प्रसुतीबाबत चिंता व्यक्त केली आणि या केंद्रांना परवानगी देताना काळजी घेण्याच आश्वासन दिलं. राज्यातली डॉक्टरांची रिक्त पदं भरण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याचं ते म्हणाले. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना संघटित गुन्हेगारीत समाविष्ट करण्यासाठी देखील विचार सुरू आहे, पुढील अधिवेशनापर्यंत असा कायदा आणला जाईल, असंही आबिटकर म्हणाले.राज्यातल्या ठेवीदारांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण सुधारणा विधेयक सरकारन आज विधानसभेत सादर केल. फसवणूक करणाऱ्यांच्या संपत्तीचा वर्षभरात लिलाव करून ठेवीदारांचे पैसे जलद परत करणे यामुळे शक्य होईल अशी आशा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधेयक मांडताना व्यक्त केली. याशिवाय डिजिटल चलनातून ठेवीदारांची फसवणूक झाली तर त्यांचे रक्षण करण्याची तरतूद या विधेयकात आहे. यापूर्वीच्या कायद्यात डिजिटल चलनातून झालेल्या फसवणुकीला कुठलेही संरक्षण नव्हत.अमरावती महानगर पालिकेमध्ये जन्म -मृत्यू प्रमाणपत्रांचे हजारो अर्ज प्रलंबित असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये असंतोष निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी विधानसभेमध्ये औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच शहरात जन्म -मृत्यू प्रमाणपत्र वितरण प्रणाली अधिक सुलभ आणि सोयीची करण्यासाठी जन्म-मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रलंबित प्रकरणांचा झोनस्तरावर निपटारा करण्याची सुचना त्यांनी सभागृहा समक्ष केली .***

***आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके***

---

विजय वडेट्टीवार

विधानसभेतील काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे म्यानमारमध्ये नोकरीच्या आमिषाने अडकलेल्या महाराष्ट्रातील तरुणांच्या सुरक्षित सुटकेची मागणी केली. तसेच समृद्धी महामार्गावरील वाढत्या अपघातांबाबत

सरकारला धारेवर धरत सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करून प्रभावी उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली. या दोन्ही गंभीर प्रकरणांत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा, असं वडेट्टीवार म्हणाले.

-----------------------------------------

**विकास ठाकरे**

नागपूर महानगरपालिकेच्या कचरा संकलनाचे कंत्राट असलेल्या एजी एन्व्हायरो आणि बीव्हीजी इंडिया यांच्या कामकाजातील अनियमिततेच्या चौकशीचा अहवाल शासनाला प्राप्त झाला असून, त्याआधारे संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. आमदार विकास ठाकरे यांनी हा मुद्दा सभागृहात उपस्थित करत चौकशी अहवाल आणि कारवाईची मागणी केली होती. तसेच नागपूरमधील पूरग्रस्तांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणीही त्यांनी केली.

-----------------------------------------

**कृषी दिन**

राज्यातले हरितक्रांतीचे जनक**,** माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती आज कृषिदिन म्हणून साजरी करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वसंतराव नाईक यांना अभिवादन केलं आहे. अपार कष्टातून धरणी मातेला समृद्ध करणाऱ्या आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देणाऱ्या समस्त शेतकरी बांधवांना कृषिदिनाच्या शुभेच्छा देत असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात देखील कृषी दिन साजरा करण्यात आला. स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर इथेही अभिवादनाचा कार्यक्रम पार पडला.यवतमाळ इथं कृषी विभाग आणि कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेतील वसंतराव नाईक सभागृहात कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना हरित क्रांतीचे प्रणेते तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या योगदानामुळे आज देश आणि महाराष्ट्र हा कृषी क्षेत्रात स्वयंपूर्ण असल्याचे गौरवोद्गार जिल्हाधिकारी विकास मीना यांनी काढले.

-----------------------------------------

**राष्ट्रीय डॉक्टर दिवस**

आज राष्ट्रीय डॉक्टर दिवस. या निमित्त उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी देशभरातल्या डॉक्टरांना समाजमाध्यमाद्वारे शुभेच्छा दिल्या आहेत. मानवतेच्या सेवेसाठी डॉक्टरांनी दाखवलेली निष्ठा, संवेदनशीलता, कौशल्य आणि कटिबद्धता

यांची त्यांनी प्रशंसा केली आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनीही देशभरातल्या डॉक्टरांना शुभेच्छा दिल्या आहेत.

---------------------------------------

**श्री सखाराम महाराज पालखी**

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील सखारामपूर येथून श्री सखाराम महाराज पालखीचं आज पंढरपूरकडे प्रस्थान झालं . टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'च्या जयघोषात शेकडो वारकरी दिंडीत सहभागी झाले. या वेळी विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्र येत पालखीचे पूजन करून वारकऱ्यांचा सन्मान केला. झाडं लावण्याचा तसंच व्यसनमुक्ती'चा संदेश देत ही दिंडी जळगाव जामोद, खामगाव आणि अकोला मार्गे पंढरपूरकडे रवाना झाली.

---------------------------------------

**सायकलवारी**

गोंदियाचे नगराध्यक्ष सचिन शेंडे यांनी विठ्ठल दर्शनासाठी गोंदिया ते पंढरपूर अशी सुमारे ८०० किलोमीटरची सायकलवारी सुरू केली आहे. पर्यावरण संवर्धन, इंधन बचत आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात कारगिल युद्धातील माजी सैनिक उद्यभान निर्वाण यांच्यासह घनश्याम उके आणि मनोज बिसेन सहभागी झाले आहेत. चार दिवसांत हा प्रवास पूर्ण करण्याचा त्यांचा संकल्प आहे.

---------------------------------------

**'चरणसेवा' उपक्रम**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे आजपासून 'चरणसेवा' उपक्रम सुरू करण्यात आला आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांतील सुमारे ४०० मुक्कामस्थळी १२ हजारांहून अधिक डॉक्टर, फिजिओथेरपिस्ट, परिचारिका आणि स्वयंसेवक वारकऱ्यांना मोफत आरोग्यसेवा, पायांची मालिश, वैद्यकीय तपासणी आणि प्राथमिक उपचार उपलब्ध करून देणार आहेत. 'भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमातून आरोग्य जनजागृतीचाही संदेश दिला जाणार आहे.

---------------------------------------

**गोमाता संवर्धन यात्रा**

चंद्रपूरच्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, चंद्रपूर इथं 3 जुलै रोजी गोमाता संवाद यात्रेचं आगमन होत असून भारतीय संस्कृतीच्या संवर्धनसाठी जनसंवाद सोहळा आयोजित करण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाला नागरिकांनी उपस्थित राहण्याचं आवाहन सहायक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. कुमरे यांनी केलं आहे.

---

**जनजागृती कार्यक्रम**

शेगाव इथल्या मौलाना अबुल कलाम आझाद नगरपरिषद उर्दू प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनींसाठी 'गुड टच-बब्ब टच' विषयावर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. शेगाव पोलिस ठाण्याचे पीएसआय संदीप बारिंगे आणि महिला पोलिस हेडकॉन्स्टेबल शबाना पटेल यांनी विद्यार्थ्यांना बालसुरक्षा, पोक्सो कायदा, व्यसनमुक्ती आणि सुरक्षित वाहतुकीबाबत मार्गदर्शन केलं. विद्यार्थ्यांमध्ये लैंगिक अत्याचारांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

---

**हवामान**

नागपूरसह विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, वर्धा, अमरावती आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये उद्या मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, गडचिरोली आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये देखील जोरदार पर्जन्यवृष्टीचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.तत्पूर्वी आज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार नागपुरात दिवसभर पावसाची रिपरिप सुरू होती. सकाळपासून असलेल्या ढगाळ हवमानामुळे उष्णतामान कमी झालं आहे. आगामी काही तासात, चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ जिल्ह्यांत काही ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट, ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वारा आणि हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तसेच अमरावती, वाशीम, बुलढाणा आणि वर्धा जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

---

**इशान किशन**

भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या ताज्या क्रमवारीत प्रथमच अव्वल स्थानी पोहोचला आहे. विराट कोहली, सूर्यकुमार यादव आणि अभिषेक शर्मानंतर टी-२० क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळवणारा तो चौथा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे.

---

**मुदतबाह्य कीटकनाशके**

यवतमाळ जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यातील खैरगाव देशमुख इथं कृषी विभागाने धडक कारवाई करत अवैध आणि मुदतबाह्य कीटकनाशके तसेच रासायनिक खतांचा

सुमारे १७ लाख ८२ हजार रुपयांचा साठा जप्त केला. अधिकृत परवान्याशिवाय हा माल आदिलाबाद आणि सारखणी येथून मागवून त्यावर बनावट लेबल लावून शेतकऱ्यांना विकला जात असल्याचं तपासात समोर आलं आहे.

-----------------------------------------